PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 6

# स्त्रियांचे कथालेखन

**प्राचार्य डॉ. ह. रा. जाधवर**
सरहद्द कॉलेज, कात्रज, पुणे
**महाराष्ट्र भारत**

स्त्रीजीवनाच्या समस्या व स्त्रीमनाचे विश्लेषण करणारे कथालेखन स्वतः स्त्रियांनीच केले असून विभावरी शिरूरकर या टोपणनावाने लेखन करणाऱ्या मालतीबाई बेडेकर यांच्या 'कळयांचे निःश्वास' (1933) हा कथासंग्रह सर्वच लेखिकांची प्रेरणा म्हणता येईल. याशिवाय कमलाबाई देशपांडे, क्षमा राव, शांताबाई नाशिककर, शांताबाई किर्लोस्कर, मालतीबाई दांडेकर अशा लेखिकांनी स्त्रीचे जीवन व भावविश्व कथांमधून साकारले. विशेषतः शांता शेळके, सुमती क्षेत्रमाडे, योगिनी जोगळेकर यांचे कथातंद्ध जुनेच असून त्यात आशयपूर्णता फारशी वाचायला मिळत नाही. वसुंधरा पटवर्धन व स्नेहलता दसनूरकर यांच्या कथेत निराळेपण आढळते. आजच्या नवकथेच्या काळात स्त्रीजीवनातील भीषण व करुण दर्शनही समजून घेता येते. कमल देसाई यांनी परिस्थिती निरपेक्ष असे मानवी मनाचे स्वायत्तविश्व साकार केले.

विजया राजाध्यक्ष यांची कथा स्त्रीजीवनातील दुःख व समस्या यांनी थेट भिडते. स्त्रियांचे खास अनुभवविश्व त्यांनी साकार केले. तारा वनारसे, पद्मीनी बिनीवाले यांच्या कथेत कौटुंबिक जिव्हाळा, नात्याचे संवेदनशील दर्शन आढळते. सुधा नरवणे यांनी स्त्रियांचे नाजूक भावविश्व साकार केले तर गौरी देशपांडे यांच्या कथासंपन्न अनुभूतीची साक्ष देताना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्रपणा जपतात. भावुकतेच्या आहारी फारसे न जाता त्यांची कथा वेगळया अनुभवातून विद्रोह दाखवून सांकेतिक प्रचलित नीतिनियमांची बंधने झुगारते. तर भारतीय संस्कृती, परंपरा यांच्याशी मिळतेजुळते समृद्ध अनुभवविश्व चित्रित करणारी आशा बगे यांची कथासंवेदना महत्त्वपूर्ण मानली जाते. त्यांच्या स्त्रीवादी कथेतील वेदना व स्नेहबंध शब्दरूप होताना त्यात उत्कट, नाजूक भाव व कोमलता प्रत्ययाला येते. वर उल्लेख केल्याप्रमाणे

कमल देसाई व सानिया यांचे कथालेखन सामाजिक व्यवस्था व स्त्रीच्या समस्येशी निगडित आहेत. स्त्रीमुक्तीच्या चळवळीमुळे या कथा समाजाभिमुख होऊ लागल्या आहेत. प्रिया तेंडुलकर, दीपा गोवारीकर यांच्या कथा मध्यमवर्गाचे अनुभव, तसेच मध्यमवर्गीय सुखवस्तूपणाविषयी असमाधान व असंतोष व्यक्त करतात. गिरीजा कीर यांनी कथाकथन कार्यक्रम लोकप्रिय करण्यात आघाडी घेतली. मेघना पेठे यांच्या कथांतून अस्वस्थ करणारे विचार व चिंतन करायला लावणारे अनुभव शब्दबद्ध झाले आहेत. नवे विषय, स्त्री-पुरुष नात्याचे वेगळे अनुभवविश्व असल्यामुळे गौरी देशपांडे, सानिया व प्रिया तेंडुलकर यांच्या कथालेखनाने वेगळे वळण आलेले दिसते. त्यांचे निरीक्षण व्यापक व सूक्ष्म असून कथेच्या आकृतिबंधही प्रभावी आहे. सरिता पदकी यांच्या कथा आटोपशीर, अर्थपूर्ण असून स्त्रीजीवनातील अस्वस्थता महत्त्वाची आहे, याचे प्रतिपादन करतात. वसुधा पाटील यांच्या कथेत भावमधुर वृत्तीचा ताजेपणा, नाट्यमय-आवेगी चित्रणे यांमुळे वाचनीय ठरतात. सुधा नरवणे यांच्या कथेचे रूप सांकेतिक कथारूपाच्या कक्षेत बसणारे असे राहिले. गौरी देशपांडे यांच्या कथेतील विश्लेषण मनोवेधक वाटते. तसेच आघाडीच्या आणखी एक कथालेखिका म्हणून ललिता गादगे यांचा उल्लेख करता येईल. कर्नाटकातील बोलीभाषेचा संदर्भही त्यांच्या कथेत येतो. 'आयुष्याच्या काठाकाठाने', 'दुःख आणि अश्रू', 'प्राजक्ताची फुले आणि दाह' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अनुराधा गुरव, मधु सावंत यांच्या कथा स्त्रीमुक्ती चळवळीचे अपयश व स्त्रीचे 'अबला'पण सूचित करतात.

कमल देसाई - 'रंग' (1962), 'रंग' (1998) - सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाला सामोरे जावे लागणा–या आजच्या स्त्रीचे दर्शन यात आढळते.

ज्योत्स्ना देवधर - 'पैलतीर' (1993) (स्त्रीच्या जीवनातील सुखदुःखे कथाविषय)

सरिता पदकी - 'घुसमट' (1980)

सुमती क्षेत्रमाडे - 'स्मृतिगंधा'

विजया राजाध्यक्ष - 'शोध'

गौरी देशपांडे - 'आहे हे असं आहे' (1986) - पुरुषप्रधान व्यवस्थेशी लढा

गंभीर वृत्तीने केलेले कलापूर्ण व आशयसंपन्न पण प्रादेशिक लेखन -

सांस्कृतिक-संदर्भातील (विदर्भ) - मूल्यजाणिवेने युक्त असणाऱ्या आशा बगे यांच्या कथालेखनाला दाद मिळाली. मध्यमवर्गीय जाणिवेने संपन्न असलेली पण आत्मसन्मानाची झलक त्यांच्या कथेत पाहायला मिळते. 'मारवा' (1984), 'उत्तर', 'पूजा' (1993), 'पाणी' (2002), 'पाऊलवाटेवरले गाव' (2005)

स्त्रीच्या अस्मितेचा एक नवा अन्वयार्थ रोहिणी कुलकर्णी यांच्या कथेत आहे. स्त्रीवादी जाणिवांचा प्रकट उद्गार हा सर्वच स्त्रीकथाकारांचा स्थीयीभाव आहे.

अंबिका सरकार - 'चाहूल' (1980), 'प्रतीक्षा' (1981)

ऊर्मिला सिरूर - 'कवडसा' (1980)

छाया दातार - 'गोष्ट साधी, सरळ सोपी' (1973), 'वर्तुळाचा अंत' (1976)

सानिया - 'शोध' (1980), 'प्रतीती' (1979) - स्त्रीसामर्थ्य व स्त्रियांच्या सुप्त गुणांचे दर्शन.

सुकन्या आगाशे - 'पतंग उडविणारा माणूस' (1989)

प्रिया तेंडुलकर - 'ज्याचा त्याचा प्रश्न' (1991), 'जावे तिच्या वंशा' (2001)

मेघना पेठे - 'हंस अकेला' (1997), 'आंधळयाच्या गायी' (2000) - रूढ नीती संकेत यांवर आघात, स्त्रीच्या माणूसपणाचा शोध घेत नव्या पद्धतीने मनोविश्लेषणात्मक कथालेखन.

अशाप्रकारे स्त्रीकथाकारांनी स्त्रीवादी जाणिवांना कथांतून जोरदार धक्का दिला आहे. या कथालेखिकांनी समकालीन वास्तवाचा थेट वेध घेताना स्त्रीच्या विविध प्रकारे होणाऱ्या अडवणुकीला वाचा फोडली आहे.

याशिवाय स्त्रीजाणिवेचा उद्गार दलित कथेतून मांडणार्या उर्मिला पवार - 'सहावं बोट' (1988), 'चौथी भिंत' (1990) यांचे कथालेखन प्रसिद्ध आहे. यातून दलित जीवनवास्तवाचे दर्शन, जागृत स्त्रिच्या आत्मभानाचे प्रकटीकरण या कथासंग्रहांतील कथांतून आढळते.

विनोदी कथालेखनात स्त्रियांचा सहभाग कमी आहे, यात शंकाच नाही. तरीही त्या संदर्भात इंद्रायणी सावकार, दीपा गोवारीकर, शकुंतला फडणीस व मंगला गोडबोले यासारख्या मोजक्या लेखिकांचे नाव घ्यावे लागते.

स्त्रियांच्या कथालेखनाचा एकंदर विचार करताना लक्षात येते की, या सर्वच कथा वा कथासंग्रहांतून विविधता व नावीन्यता आढळते. लग्न, संसार, पती, विवाहबाह्य संबंध इ. विषयांवर विविधांगी भावानुभूतीने या कथा लिहिल्या आहेत. काही कथांत स्त्रियांच्या शरीरकेंद्री अनुभूतीचे वर्णन येते. हे सर्व कथालेखन प्रगल्भ, संवेदनशील आणि निष्ठापूर्ण वृत्तीने झाले आहे. मनोविश्लेषणही प्रत्ययाला येते. कमल देसाईंच्या कथा माणसामाणसातील नात्यांचा शोध घेतात. वाचकप्रिय-लोकप्रिय कथालेखिका म्हणून सुमती क्षेत्रमाडे, स्नेहलता दसनूरकर, कुमुदिनी रांगणेकर, कुसुम अभ्यंकर तसेच शैलता राजे, शकुंतला गोगटे यांनीही गंभीर-प्रगल्भ वृत्तीने लेखन केले. स्त्रीच्या आत्मभानाचे, बदलत्या संवेदनशीलतेचे आधुनिक जाणिवांचे चित्रण त्यात आढळते. ते स्त्रीलक्ष्यी, स्त्रीकेंद्री म्हणूनच महत्त्वाचे वाटते.

## संदर्भग्रंथ

1) डॉ.सौ. प्रतिमा इंगोले, अध्यक्षीय भाषण, विदर्भ साहित्य संघ, दर्यापूर शाखा, दि. 23-12-2000

2) तत्रैव, 'अकसिदीचे दाने', 1998, पृ.7

3) तत्रैव 'सुगरनचा खोपा', 1989, पृ. 5

4) शारदा साठे, प्रस्तावना, जावायाचं पोर, 1989, पृ.17-18

5) प्रतिमा इंगोले, 'लेक भुईची', 1991, पृ.5

6) प्रतिमा इंगोले, 'हिरवे स्वप्न' (मनोगत), 1994

7) प्रतिमा इंगोले, 'अंधारपर्व', मधु प्रकाशन, पुणे, 1999

8) निर्मलकुमार फडकुले, 'प्रबोधनातील पाऊलखुणा' (गं.बा.सरदारांचे निवडक लेख), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे , 1998. पृ. 29

9) हिम्मत शेकोकार, 'साहित्य स्पंदन' - (गाठीभेटी) - प्रतिमा इंगोले यांची घेतलेली मुलाखत, दैनिक ___ 'देशोन्नती', 24 मे 1998, रविवार, पान - 2

10) विमलाबाई कुकडे (संपा.), 'पानावरील रेषा', प्रथमावृत्ती - 1995, मलपृष्ठ (डॉ. मधुकर वाकोडे)

11) प्रतिमा इंगोले - 'हजारी बेलपान',1997 पृ.7

12) प्रतिमा इंगोले- 'अकासिदीचे दाने', सोनल प्रकाशन, दर्यापूर, चतुर्थ आवृत्ती -1998, डॉ. उषा देशमुख, 'वसंत', कथाविशेषांक, मुंबई

13) पंजाबराव इंगोले,(स) 'खोप्याची वीण' -प्रथमावृत्ती 1999 पृ.क्र.14

14) इंदूमती लहाने, 'अक्षरवैदर्भी', एप्रिल मे 1999

15) सिंधू मांडवकर, दै-'लोकमत', 20 एप्रिल 1990

16) वीणा देव, दै. 'महाराष्ट्र टाईम्स', दि. 1 जुलै 1990

17) प्रतिमा इंगोले, 'लेक भुईची', 1995, मलपृष्ठ गोले, 'अंधारपर्व', 1999 - पृ.5